# MITHI RIVER DEVELOPMENT AND PROTECTION AUTHORITY (MRDPA)



# Compendium of Authority Meeting

# MITHI RIVER DEVELOPMENT & PROTECTION AUTHORITY

# SEPARATOR

Minutes of 3rd Authority Meeting

# मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरणाच्या तिसऱ्या बैठकीचे इतिवृत्त

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | २६ ऑक्टोबर, २००६ (गुरुवार) |
| वेळ | : | दुपारी १.०० वाजता |
| सभास्थान | : | मुख्यमंत्र्याचे समिती कक्ष |

मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरणाच्या सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | मा. श्री. विलासराव देशमुख<br>मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य | अध्यक्ष |
| २) | मा. श्री. नारायण राणे<br>महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य | सदस्य |
| ३) | मा. श्री. नवाब मलिक<br>आमदार महोदय | सदस्य |
| ४) | मा. श्री. जनार्दन चांदूरकर<br>आमदार महोदय | सदस्य |
| ५) | मा. कुमारी वर्षा गायकवाड<br>आमदार महोदया | सदस्या |
| ६) | मा. डॉ. डी.के. शंकरन<br>मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य | सदस्य |
| ७) | श्री. रामानंद तिवारी<br>प्रधान सचिव, नवि - १ | सदस्य |
| ८) | डॉ. जयराम फाटक<br>प्रधान सचिव नवि - २ | सदस्य |
| ९) | श्री. एस.एस. हुसेन<br>प्रधान सचिव महसुल | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| १०) | श्रीमती शरवरी गोखले<br>प्रधान सचिव, पर्यावरण | सदस्य |
| ११) | मा. श्री. जॉनी जोसेफ<br>महानगरपालिका आयुक्त<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| १२) | मा. डॉ. टी. चंद्रोखर<br>महानगर आयुक्त, मुं.म.प्र.वि.प्रा. | सदस्य |
| १३) | मा. श्री. स्वाधिन क्षत्रिय<br>सचिव, गृहनिर्माण | सदस्य |
| १४) | मा. श्री. संजय उबाळे<br>सचिव, विशेष प्रकल्प | सदस्य |
| १५) | मा. श्रीमती शिवानी ढगे<br>वरिष्ठ सहाय्यक संचालक<br>राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्था | सदस्य (प्रतिनिधी) |
| १६) | प्रो. आर.के. मलिक<br>डीन, आय.आय.टी. बॉम्बे | सदस्य (प्रतिनिधी) |
| १७) | डॉ. विकास तोंडवळकर<br>प्रकल्प संचालक व सदस्य सचिव | सदस्य सचिव |

**<u>निमंत्रित</u>**

१) श्री. देबाशिष चक्रवर्ती
मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

२) श्री. श्रीकांत सिंह
अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त
बृहन्मुंबई महानगरपालिका

३) श्री. इक्बाल चहल
उपाध्यक्ष, म्हाडा

४) डॉ. दिलिप बोराळकर
सदस्य सचिव
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण केंद्र

५) श्री. आर.जे. ट्रेजरिवाला
संचालक - मुंबई आंतरराष्ट्रीय विमानपत्तन प्रा. लि.

६) श्री. एस.एस. साधू
मुंबई आंतरराष्ट्रीय विमानपत्तन प्रा. लि.

७) श्री. चंदरभान मनवानी
मुंबई आंतरराष्ट्रीय विमानपत्तन प्रा. लि.

८) श्री. आर.एम.चारुधन
मुंबई आंतरराष्ट्रीय विमानपत्तन प्रा. लि.

९) प्रो. एस.के. गुप्ता
आय.आय.टी. बॉम्बे

१०) प्रो. आर. नागराजन
आय.आय.टी. बॉम्बे

मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरणाचे अध्यक्ष व मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे तसेच सर्व उपस्थित सदस्यांचे डॉ. विकास तोंडवळकर, प्रकल्प संचालक व सदस्य सचिव, प्राधिकरण यांनी तिस-या बैठकीच्या निमित्ताने स्वागत केले.

बैठकीच्या विषयपत्रिकेत नमुद केलेल्या बाबी प्राधिकरणाच्या विचारार्थ पटलावर ठेवण्यात आल्या.

**बाब क्र. १**

डॉ. तोंडवळकर - सदस्य सचिव यांनी मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरणाच्या दुस-या बैठकीचे इतिवृत्त सभेत वाचून दाखविले. ते तसेच्या तसे सर्व संमतीने प्राधिकरणाने मंजूर केले.

बाव क्र. २

मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरणाच्या दुस-या सभेत घेण्यात आलेल्या निर्णयांवरील कार्यपूर्ती अहवालाचे वाचन सदस्य सचिव यांनी प्राधिकरणाच्या मा. सभासदांसमोर केले. मा. मुख्यमंत्री महोदयांनी, मागील सभेत ठरल्याप्रमाणे सर्व संबंधित संस्थांनी मिठी नदी विकासाच्या पहिल्या टप्प्याची कार्ये विविध सरकारी / निमसरकारी संस्थांनी योग्य वेळेत पूर्ण केल्याबाबत समाधान व्यक्त केले. परंतु त्याच बरोबर दुस-या टप्प्याच्या कामांना सर्व संबंधित सदस्यांनी लवकरात लवकर सुरुवात करावी असे आदेश दिले.

मा. आमदार श्री. नवाब मलिक यांनी मिठी नदी प्रकल्प बाधित व्यावसायिक गाळयांचे पुनर्वसन योग्य रितीने झाले नसल्याचे मा. अध्यक्ष महोदयांच्या निदर्शनास आणून दिले. मिठी नदी विकासाच्या पहिल्या टप्प्यातील प्रकल्पबाधित पात्र व्यावसायिक गाळयांचे पुनर्वसन तुंगा व्हिलेज तसेच तुर्भे मंडाले येथे केले असल्याचे सदस्य सचिव यांनी प्रतिपादन केले. यावर मा. आमदार श्री. नवाब मलिक यांनी व्यावसायिक गाळेधारकांना तुर्भे मंडाले येथे मुंबई महानगरपालिकेतर्फे नाहरकत दाखला न मिळाल्यामुळे बांधकाम करणे शक्य नसल्याचे सांगितले. यावर संबंधित व्यावसायिक गाळेधारकांचे लवकरात लवकर पुनर्वसन व्हावे याकरिता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास योग्य ती कार्यवाही त्वरित करण्याचे निर्देश मा. मुख्यमंत्र्यांनी दिले.

बाब क्र. ३ व ४

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, बृहन्मुंबई महानगरपालिका व विमानपत्तन प्राधिकरण या प्रकल्प राबविणा-या संस्थांनी मिठी प्रकल्पाचा टप्पा दोन चा कृती आराखडा सभेपुढे सादर केला. महानगर आयुक्त, मुं.म.प्र.वि.प्रा. यांनी माहिती दिली की, मिठी नदी विकास प्रकल्पाचा डी.पी.आर. जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्वनवीनीकरण योजनेअंतर्गत केंद्र शांसनाकडून अनुदान मिळण्याकरीता सादर केला असतांना केंद्र शासनाच्या संमतीशिवाय निविदा सूचना काढणे योग्य होणार नाही. यावर मा. अध्यक्ष महोदयांनी मा. मुख्य सचिवांना आदेश दिले की, या

प्रकल्पाचे आपत्कालिक स्वरुप लक्षात घेता ब्रीम्स्टोवॅड प्रकल्पाच्या धर्तीवर पुर्णतः अनुदान तत्वावर आर्थिक मदत देण्याकरिता केंद्र शासनास पत्राद्वारे त्वरित कळविण्यात यावे. त्याच बरोबर केंद्र शासनाच्या मंजूरीची प्रतीक्षा न करता मिठी प्रकल्पाच्या टप्पा दोनच्या कामाच्या निविदा त्वरित काढण्याचे आदेश बृहन्मुंबई महानगरपालिका व मुं.म.प्र.वि.प्रा. यांना दिले.

श्री. ट्रेजरिवाला, संचालक, मुंबई आंतरराष्ट्रीय विमानपत्तन प्रा. लि. यांनी असे प्रतिपादन केले की, त्यांच्या क्षेत्रात येणा-या मिठी नदीच्या प्रवाहाचे सुरळीकरण/रुंदीकरण करण्याच्या दृष्टीने सल्लागारांची नियुक्ती करण्यात आली आहे व सल्लागारांच्या सल्ल्यानुसार सुरळीकरणाची / रुंदीकरणाची कामे त्वरित हाती घेण्यात येतील. यावर मा. अध्यक्ष महोदयांनी नदीचे सुरळीकरण / रुंदीकरण करताना कमीत कमी रुंदी चितळे समितीच्या शिफारशीनुसार जास्तीत जास्त रुंदी सी.डब्ल्यु.पी.आर.एस., पुणे यांच्या शिफारशीनुसार शक्यतोवर करण्यात यावे असे आदेश दिले.

तसेच महानगरपालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी मिठी नदी प्रकल्पाच्या टप्पा दोनच्या कामात येणा-या अडचणींची माहिती सभेपुढे प्रतिपादन केली. यावर मा. अध्यक्ष महोदयांनी शक्य असेल तेथे कमीत कमी रुंदी चितळे समितीच्या शिफारशीनुसार तसेच जास्तीत जास्त रुंदी सी.डब्ल्यु.पी.आर.एस., पुणे यांच्या शिफारशीनुसार योग्य तो समन्वय साधून व्यावहारिक तत्वावर आय.आय.टी. बॉम्बे च्या सल्ल्यानुसार दिनांक ६ नोव्हेंबर, २००६ पर्यंत अहवाल तयार करुन मिठी नदी प्राधिकरणाच्या शक्तीप्रदत्त समितीपुढे मंजूरीकरिता सादर करण्यात यावा असे आदेश दिले.

याच धर्तीवर मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाच्या हद्दीत येणा-या मिठी नदी प्रकल्पाच्या टप्पा दोनची कामे शक्यतोवर सी.डब्ल्यु.पी.आर.एस. व आय.आय.टी. च्या शिफारशी नुसार योग्य तो समन्वय साधून व्यावहारिक तत्वावर करण्याकरीता दिनांक ६ नोव्हेंबर, २००६ पर्यंत अहवाल तयार करुन मिठी नदी प्राधिकरणाच्या शक्ती प्रदत्त समितीपुढे मंजूरीकरीता सादर करण्यात यावा असे आदेश दिले.

बाब क्र. ५

मिठी नदी विकास प्रकल्पाच्या दुस-या टप्प्यातील कामांनी बाधित पात्र निवासी व अनिवासी प्रकल्पग्रस्तांना गाळे उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी मुं.म.प्र.वि.प्रा.कडे सोपविण्यात आलेली आहे. मुं.म.प्र.वि.प्रा. च्या हद्दीतील टप्पा दोन च्या कामामुळे अंदाजे ९ हजार प्रकल्पग्रस्त तसेच बृहन्मुंबई पालिकेच्या हद्दीत अंदाजे १२ हजार प्रकल्पग्रस्तांचे पुर्नसन करणे आवश्यक आहे असे नमूद करण्यात आले. या अनुषंगाने महानगर आयुक्त, मुं.म.प्र.वि.प्रा. यांनी एवढया संख्येत गाळे उपलब्ध नसल्याचे सांगितले.

मिठी नदी विकास प्रकल्पाचे बाधित होणा-या पात्र निवासी व अनिवासी प्रकल्पबाधितांना गाळे उपलब्ध करण्याच्या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण , श्री. चक्रवर्ती यांना विचारणा केली असता त्यांच्याकडे एवढया मोठया संख्येत गाळे उपलब्ध नसल्याचे प्रतिपादन करण्यात आले.

या सर्व बाबींचा विचार करुन असा निर्णय घेण्यात आला की, नागरी जमिन कमाल धारणा अंतर्गत शासनाच्या ताब्यात असलेली जमिन मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाकडे सुपूर्द करुन मिठी प्रकल्पबाधितांसाठी सदनिका / गाळे बांधण्यात यावेत. यावर त्वरित योग्य ती कार्यवाही करण्याचे आदेश प्रधान सचिव, नवि-१ यांना मा. मुख्यमंत्री महोदयांनी दिले.

मा. अध्यक्ष महोदयांनी मिठी नदी विकास प्रकल्प लवकरात लवकर सुरु करण्याचे आदेश दिलेले होते. या संदर्भात विचारणा केली असता महानगर आयुक्त, मुं.म.प्र.वि.प्रा. यांनी माहिती दिली की, मिठी नदी विकास प्रकल्पाचा डी.पी.आर. केंद्र शासनास सादर केला असतांना निविदा सुचना केंद्र सरकारच्या समितीशिवाय काढणे योग्य होणार नाही असे प्रतिपादन केले. त्यावर मा. अध्यक्ष महोदयांनी मा. मुख्य सचिव यांना मिठी प्रकल्पाचे आपत्कालिन स्वरुप लक्षात घेता त्वरित पूर्णतः अनुदान तत्वावर आर्थिक मदत घेण्याकरीता केंद्र शासनास कळविण्याचे आदेश दिले.

**बाब क्र. ६**

मा. अध्यक्ष महोदयांच्या पूर्वानुमतीने जवाहर नेहरु राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून आर्थिक अनुदान मिळणे संदर्भात सादर केलेल्या डि.पी.आर. ची सद्यस्थिती बद्दल माहिती देण्यात आली.

या संदर्भात निरी या संस्थेने दिलेल्या संस्तुतीनुसार / परीक्षणानुसार

सी.डब्ल्यु.पी.आर.एस. व आय.आय.टी. बॉम्बे यांच्या शिफारशीनुसार मिठी नदी विकास आराखडयावर प्रकल्पबाधितांकडून सुचना / हरकती मागविण्याबाबत सूचना केलेली होती. त्यानुसार प्रकल्पबाधितांकडून सूचना / हरकती मागविण्याकरीता दिनांक १९-१०-२००६ रोजी इंग्रजी व मराठी स्थानिक वृत्तपत्रांत मिठी नदी प्राधिकरणाने जाहिरात दिल्याबाबतची माहिती सभेस सादर केली.

प्रकल्पबाधितांकडून सूचना / हरकती मागविण्याकरीता एक महिन्याची मुदत दिलेली आहे. त्यानुसार आलेल्या सूचना / हरकतींवर सुनावणी करुन तसेच शक्तीप्रदत्त समितीच्या मंजूरीप्रमाणे मिठी नदी विकास आराखडा प्राधिकरणासमोर येत्या बैठकीत मंजूरीकरता सादर करण्यात येईल.

वरील कामे त्वरित होण्याच्या दृष्टीने प्रकल्प संचालक (मि.न.वि. व सं.प्राधिकरण) यांना स्वतंत्र कार्यालय व स्वतंत्र तांत्रिक / प्रशासकीय कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन देण्यात यावे असे ठरविण्यात आले.

मा. अध्यक्ष महोदय यांचे आभार मानून सभेचे कामकाज संपल्याचे जाहीर करण्यात आले.

**मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरणाची ३ री बैठक**
**दिंनाक २६ ऑक्टोबर, २००६**
**विषय - सभेत घेतलेले निर्णय दर्शविणारा तक्ता**

| अनुक्रम | सभेत घेतलेले निर्णय (26 Oct 2006) 3rd Meeting | अंमलबजावणी करणारी संस्था | अंमलबजावणी पूर्ण होण्यास अपेक्षित कालावधी |
|---|---|---|---|
| १ | मिठी नदी विकासाच्या पहिल्या टप्पातील प्रकल्पबाधीत पात्र व्यावसायिक गाळेधारकांचे लवकरात लवकर पुनर्वसन व्हावे याकरिता योग्य ती कार्यवाही करणे. | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण / बृहन्मुंबई महानगरपालिका | १५ डिसेंबर २००६. |
| २ | मिठी प्रकल्पाचे आपत्कालिक स्वरुप लक्षात घेता ब्रीम्स्टोवॅड प्रकल्पाचा धर्तीवर पुर्णतः अनुदान तत्वावर आर्थिक मदत देण्याकरिता केंद्र शासनास पत्राद्वारे त्वरीत कळविण्यात यावे. | मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन. | ३ नोव्हेंबर २००६. |
| ३ | मिठी नदी प्रकल्पाच्या टप्पा दोनच्या कामाच्या निविदा त्वरीत काढणे. | मुंबई महानगरपालिका/ मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण | १० नोव्हेंबर २००६. |
| ४ | मा. अध्यक्ष महोदयांनी नदीचे सुरळीकरण/रुंदीकरण करताना कमीत कमी रुंदी चितळे समितीच्या शिफारशीनुसार जास्तीत जास्त रुंदी सी. डब्ल्यू.पी.आर.एस., पुणे यांच्या शिफारशीनुसार शक्यतोवर करण्यात यावे. | मुंबई आंतरराष्ट्रीय विमानपत्तन प्रा. लि. | मे २००७. |
| ५ | मिठी नदीच्या पात्रामध्ये शक्य असेल तिथे कमीत कमी रुंदी चितळे समितीच्या शिफारशीनुसार तसेच जास्तीत जास्त रुंदी सी. डब्ल्यू.पी.आर.एस., पुणे यांच्या शिफारशीनुसार योग्य तो समन्वय साधून व्यावहारिक तत्वावर आय. आय.टी. बॉम्बेच्या सल्ल्यानुसार दिंनाक ६ नोव्हेंबर, २००६ पर्यंत अहवाल तयार करुन मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या उच्चस्तरिय समिती समोर ठेवून त्यांनी निर्णय द्यावा. मिठी नदी प्राधिकरणाच्या शक्तीप्रदान समितीपुढे मंजुरीकरिता सादर करणे) | बृहन्मुंबई महानगरपालिका/ मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन. | ६ नोव्हेंबर २००६. |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | मु.म.प्र.वि. प्राधिकरणाच्या हद्दीत येणा-या मिठी नदी प्रकल्पाच्या टप्पा दोनची कामे शक्यतोवर पी. डब्ल्यू.पी.आर.एस. व आय. आय. टी. च्या शिफारशीनुसार योग्य तो समन्वय साधून व्यावहारिक तत्वावर करण्याकरिता दिनांक ६ नोव्हेंबर, २००६ पर्यत अहवाल तयार करुन मिठी नदी प्राधिकरण्याच्या शक्ती प्रदत्त समितीपुढे मंजूरीकरीता सादर करणे. | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण | ६ नोव्हेबर २००६. |
| ७ | नागरी जमिन कमालधारणा अंतर्गत शासनाच्या ताब्यात असलेली जमिन मुं म. प्र. वि. प्राधिकरणाकडे सुपूर्द करुन मिठी प्रकल्पबाधितांसाठी सदनिका/गाळे बांधणे. | मा. प्रधान सचिव, नवि-१ मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण | फेब्रुवारी २००७. |
| ८ | प्रकल्पबाधितांकडून आलेल्या सूचना/हरकतीवर सुनावणी करुन तसेच शक्तीप्रदत्त समितीच्या मंजुरीप्रमाणे मिठी नदी विकास आराखडा प्राधिकरणासमोर येत्या बैठकीत मंजूरीकरता सादर करणे. | मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरण | पुढील बैठकीत. |

## 4th Meeting of Mithi River Development and Protection Authority

**Item No. 2: Finalisation of feasible alignment of Mithi river development zone**

Mithi river development zone comprises of widening of Mithi river as per the recommendations of CWPRS and buffer zone on either side of the bank as recommended by IIT, Bombay. Based on the recommendations of CWPRS, Khadakwasala, the IIT Bombay had prepared Mithi River Development Zone Plan delineating alignments for widening on either side of the river following the natural course of the river. The said development Plan was placed before the MRDP Authority in its meeting held on October 26,2006. During the discussions Municipal Commissioner, MCGM and the Metropolitan Commissioner, MMRDA expressed the concern regarding the constraints likely to be posed during the implementation of the said plan such as authorized structures, existing DP roads, water supply pipelines along the alignment, presence of mangroves within BKC, etc. After considering these constraints Chairman of the Authority had directed to prepare feasible Mithi River Development Zone Plan after inviting the suggestions and objections from the public and affected community by giving Press note. The MRDPA in the same meeting had also directed the Empowerment Committee to conduct its meeting and finalize the feasible Mithi river development zone plan.

Accordingly, the suggestions and objections from individuals affected by the area covered under widening of river on either side and buffer zone/additional buffer zone as well as from general public were invited on the proposals of widening recommended by C.W.P.R.S. and on buffer zone as recommended by IIT, Bombay. For obtaining the said suggestions and objections a 30 days public notice was given in English in Free Press Journal newspaper and in Marathi in Navashakti newspaper on October 19, 2006 indicating that the suggestions and objections would be received within 30 days from the date of publishing the notice. The suggestions and objections from the 84 affected individual/groups and general public were received.

The Committee comprising following members was constituted for hearing of suggestions / objections received on the proposal of Mithi river alignment and buffer Zone along Mithi River and to give recommendations regarding feasible widening which could be required to mitigate the floods in case of heavy rainfall.

1) Dr Vikas Tondwalkar
Project Director and Member Secretary
MRDPA.
Mumbai 400 051

2) Dr Rakesh Kumar,
Head. Mumbai Zonal Laboratory,
National Environmental Engineering Research Institute.
Worli.
Mumbai – 400 025

3) Mr N. V. Kulkarni,
Ex-Deputy Director (TP)
3. Indu Kiran Apartment,
12/941. Ideal Colony,
Kothrud.
Pune - 411 038

4) Martina Sapkal
Legal Expert
Bombay Mutual Chamber,
4th floor, 19/21' Ambalal Doshi Marg,
Mumbai - 400 001

The Committee considered the following before recommending the feasible alignment of Mithi river and Vakola nalla:

i) The recommendations of Interim report of CWPRS. Khadakwasala (2006) and IIT. Bombay (2006) as well as suggestions of NEERI. Nagpur while apprasing the proposal of Government of Maharashtra under JNNURM.

ii) Enhancing the flood mitigation potential of Mithi river and Vakola Nalla.

iii) Original course of the Mithi river and Vakola Nalla are not disturbed to the extent possible.

iv) Suggestions and objections received from the affected individual/groups/public.

## $4^{th}$ Meeting of Mithi River Development and Protection Authority

**Item No. 3 : Review of the Progress of Works to be undertaken in Phase II by MMRDA and MCGM.**

**MCGM Works -**

MCGM has proposed to undertake the following works in Phase II :

- To widen and deepen the Mithi River having a length of 11.5 km in MCGM's jurisdiction. (from CST bridge to Saphed pool Nalla as per CWPRS recommendations and remaining as per the feasible width.)
- To construct the R.C.C. retaining wall on both banks of the river.
- To construct 12 m wide service roads on both the banks of the river (except Airport Authority compound wall).

Tender notice was published on 2-11-2006. The toal estimated cost Rs.182 Crores. The tenders have been submitted on 14-11-2006. The Tender evaluation has been completed. The work order to the Contractors will be issued soon. The target date of completion of the works is 31-05-2008. Preparing the Tender for Remodeling of Bridges at Kalina Road and Kranti Nagar. The Tender for widening and deepening of Vakola Nalla within the stretch of MCGM have been finalized. The desilting works have been commenced in the first week of April, 2007.

**MMRDA Works -**

MMRDA has proposed to undertake the following works in Phase II :

- To widen and deepen the Mithi River having a length of 6 km and Vakola Nall havng length of 2.5 km in MMRDA's jurisdiction.
- To construct the R.C.C. retaining wall on both banks of the Mithi River and to construct R.C.C. diaphragm wall on both banks of Vakola Nalla.
- To construct 20 m wide service roads on both the banks of the river and Vakala Nalla.
- To excavate/remove 2,00,000 cum.m. rocky outcrop at sea ward side of Mahim causeway.

Tender Notice was published on 9-12-2006. The total estimated cost Rs.272 Crores. The Tenders were supposed to be received on January 23, 2007. However, on the request of bidders the date was extended to February 6, 2007 and have been finalized in March, 2007. The desilting works have been commenced by MMRDA in the first week of April, 2007.

## मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरणाची ३ री बैठक

दिंनाक २६ ऑक्टोबर, २००६

विषय - सभेत घेतलेले निर्णय दर्शविणारा तक्ता

| अनुक्रमांक | सभेत घेतलेले निर्णय<br>28/10/2006<br>3rd mtg. | अंमलबजावणी करणारी संस्था | अंमलबजावणी पूर्ण होण्यास अपेक्षित कालावधी |
|---|---|---|---|
| १ | मिठी नदी विकासाच्या पहिल्या टप्पातील प्रकल्पबाधीत पात्र व्यावसायिक गाळेधारकांचे लवकरात लवकर पुनर्वसन व्हावे याकरिता योग्य ती कार्यवाही करणे. | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण / बृहन्मुंबई महानगरपालिका | १५ डिसेंबर २००६. |
| २ | मिठी प्रकल्पाचे आपत्कालिक स्वरुप लक्षात घेता ब्रीम्स्टोवॅड प्रकल्पाचा धर्तीवर पुर्णतः अनुदान तत्वावर आर्थिक मदत देण्याकरिता केंद्र शासनास पत्राद्वारे त्वरीत कळविण्यात यावे. | मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन. | ३ नोव्हेंबर २००६. |
| ३ | मिठी नदी प्रकल्पाच्या टप्पा दोनच्या कामाच्या निविदा त्वरीत काढणे. | मुंबई महानगरपालिका/ मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण | १० नोव्हेंबर २००६. |
| ४ | मा. अध्यक्ष महोदयांनी नदीचे सुरळीकरण/रुंदीकरण करताना कमीत कमी रुंदी चितळे समितीच्या शिफारशीनुसार जास्तीत जास्त रुंदी सी. डब्ल्यू.पी.आर.एस., पुणे यांच्या शिफारशीनुसार शक्यतोवर करण्यात यावे. | मुंबई आंतरराष्ट्रीय विमानपत्तन प्रा. लि. | मे २००७. |
| ५ | मिठी नदीच्या पात्रामध्ये शक्य असेल तिथे कमीत कमी रुंदी चितळे समितीच्या शिफारशीनुसार तसेच जास्तीत जास्त रुंदी सी. डब्ल्यू.पी.आर.एस., पुणे यांच्या शिफारशीनुसार योग्य तो समन्वय साधून व्यावहारिक तत्वावर आय. आय.टी. बॉम्बेच्या सल्ल्यानुसार दिंनाक ६ नोव्हेंबर, २००६ पर्यत अहवाल तयार करुन मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या उच्चस्तरिय समिती समोर ठेवून त्यांनी निर्णय द्यावा. मिठी नदी प्राधिकरणाच्या शक्तीप्रदान समितीपुढे मंजुरीकरिता सादर करणे) | बृहन्मुंबई महानगरपालिका/ मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन. | ६ नोव्हेंबर २००६. |

| अनुक्रम | सभेत घेतलेले निर्णय | अंमलबजावणी करणारी संस्था | अंमलबजावणी पूर्ण होण्यास अपेक्षित कालावधी |
|---|---|---|---|
| ०६. | मु.म.प्र.वि.प्राधिकरणाच्या हद्दीत येणाऱ्या मिठी नदी प्रकल्पाच्या टप्पा दोन ची कामे शक्यतोवर सी.डब्ल्यू.पी.आर.एस. व आय.आय.टी. च्या शिफारशीनुसार योग्य तो समन्वय साधून व्यावहारिक तत्वावर करण्याकरिता दिनांक ६ नोव्हेंबर, २००६ पर्यंत अहवाल तयार करुन मिठी नदी प्राधिकरणाच्या शक्ती प्रदत्त समितीपुढे मंजूरीकरीता सादर करणे. | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण | ६ नोव्हेंबर २००६ |
| ०७. | नागरी जमिन कमाल धारणा अंतर्गत शासनाच्या ताब्यात असलेली जमिन मु.म.प्र.वि.प्राधिकरणाकडे सुपूर्द करुन मिठी प्रकल्पबाधितांसाठी सदनिका / गाळे बांधणे. | मा. प्रधान सचिव, नवि-१<br>मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण | फेब्रुवारी २००७ |
| ०८. | प्रकल्पबाधितांकडून आलेल्या सूचना / हरकतींवर सुनावणी करुन तसेच शक्तीप्रदत्त समितीच्या मंजूरीप्रमाणे मिठी नदी विकास आराखडा प्राधिकरणासमोर येत्या बैठकीत मंजूरीकरता सादर करणे. | मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरण | पुढील बैठकीत. |

संदर्भ क्र. २६/१०/२००६

Attendance Sheet 3rd mtg 26.10.06

मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरणाच्या इतिवृत्तास मान्यता देणे बाबतची मिटींग, उपस्थितांचे यादी

| अ.क्र. | पदाधिकारी व अधिकाऱ्यांचे नांव | हुद्दा | स्वाक्षरी |
|---|---|---|---|
| 1 | नवाब मलिक | आमदार | |
| 2 | J. C. Chandran | ,, | |
| 3 | वर्षा ए. गायकवाड | आमदार | |
| 4 | इंदिरा रेड्डी | प्र. सचिव पर्यावरण | |
| 4. | डॉ. दिलीप बोराळकर | सदस्य सचिव म.प्र.नि.मं. (MPCB) | 26.10.06 |
| 5. | R. J. Treasurywala | Director MIAL | 26/10 |
| 6. | S. S. Sadhu. | MIAL | |
| 7 | C. Manwani | MIAL | 26/10 |
| 8 | R. M. Choudhari | MIAL | 26/10 |
| 9. | Prof. R. K. Malik | Dean (Planning) IIT Bombay | 26/10/2006 |
| 10. | Prof. S. K. Gupta, CESE | I.I.T., Bombay | 26/10/06 |
| 11 | R. Nagarajan, CSRE | " " | 26/10/06 |
| 12 | Dr. J. M. PHATAK, Principal Secretary | UDD(2), GoM | |
| 13. | रंजन उबाळे, सचिव (वि.प्र.) | | |
| 14. | स्था. शि. सिन्हा, | सचिव गृहनिर्माण | |
| 15. | S. S. HUSSAIN. | Pr. Secretary (Revenue) | |
| | | PS WD | |
| 16 | R. TIWARI | | |
| 17 | Shivani Dhage | Sr. Asst. Director NEERI | |
| 18 | L. M. Bhise | E.E. MIDC | |
| 19 | श्री. डी. चक्रवर्ती | CEO, SRA | |
| 20 | श्री. श्रीकांत सिंह | AMC, MCGM | |